


दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ ▪ अंक १५५ ▪ गुरुवार ५ मार्च २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

# श्रीपाद छिंदमकडून शिवजयंतीचा डामडौल

## हिंदुत्ववाद्यांच्या आक्षेपाने पोलिसांसमोर पेच; फ्लेक्सवरील नाव काढण्याच्या हालचाली सुरू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तिथीनुसार उद्या, शुक्रवारी साजऱ्या होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त माजी उपमहापौर तथा नगरसेवक श्रीपाद छिंदम याने दिल्ली गेट येथे शिवजयंती उत्सव कार्यक्रमाचा डामडौल तयार केला आहे. परंतु शिवद्रोही छिंदमला शिवजयंती साजरी करण्याचा कोणताही अधिकार नसल्याचा आक्षेप हिंदुत्ववाद्यांनी घेतल्याने पोलिसांपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे.

श्रीपाद छिंदमला शिवजयंती सादरी करण्याचा कोणताही अधिकार नसल्याबाबतचा आक्षेप पोलिसांकडे आल्याने पोलिसांकडून खबरदारीचा उपाय म्हणून दिल्लीगेट येथे श्रीपाद छिंदम यांच्या नावाने लावण्यात आलेले फ्लेक्स व स्टेजजवळ लावण्यात आलेल्या खांबावरील स्टिकरवरील नाव हटवून त्यांचे बंधू श्रीकांत यांच्या नावाचा पर्याय करण्याचे प्रयत्न सुरु होते.

सात वर्षांपुर्वी माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम याच्याकडून मोबाईलवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अनुद्गार काढले ■ पान ४ वर




### तर छिंदमला काळे फासण्याचा इशारा

**हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी श्रीपाद छिंदमच्या शिवजयंती साजरी करण्यावर आक्षेप घेतला आहे. त्याला एक दिवसासाठी तडीपार करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. परंतु पोलिसांनी काहीच दखल घेतली नाही तर छिंदमला काळे फासण्यात येईल, असाही इशारा हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी दिला आहे.**

### छिंदम विरोधात सायंकाळी आंदोलन

**श्रीपाद छिंदम याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केल्याने शिवजयंती साजरी करण्याचा त्याला कोणताही अधिकार नसून त्याच्या या भुमिकेविरोधात गुरुवारी सायंकाळी दिल्ली गेट येथे निषेध आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली.**



श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने उद्या (६ मार्च ) रोजी संपन्न होणाऱ्या शिवजयंती निमित भव्य देखाव्याचे आयोजन करण्यात आले असून छत्रपती शिवरायांची आसनस्थ भव्य मुर्ती क्रेनने आणण्यात आली. (छाया – अनिल शाह.)

# हद्दपार आदेशाचे उल्लघन करणाऱ्या बायजाबाई जेऊन येथील एकाला अटक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हद्दपार आदेशाचे उल्लघन करून बायजाबाई जेऊर येथे वास्तव्यास असल्याचे आढळून आल्याप्रकरणी मुनाफ चॉद शेख (वय ४५, रा. बायजाबाई जेऊर, ता.नगर) याला एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार टोळी तडीपार करण्यात आली होती. त्यामुळे मुनाफ याचा समावेश होता. त्याला जिल्ह्यात मनाई करण्यात आली होती.परंतु तो



बायजाबाई जेऊर येथे असल्याची समजताच सहाय्यक पोलिस निरीक्ष माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हवलदार राजजू सुद्रीक, दिपक फुंदे, राहुल ढाकणे, यांनी छापा टाकुन मुनाफ याला अटक केली आहे.

# गावठी कट्टा बाळगणाऱ्यास अटक

## एलसीबीची कारवाई । १ आरोपी अटक तर दुसरा फरार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील मोरेचिंचोरे येथे कमरेला गावठी कट्टा लावून फिरणाऱ्या सतिष विश्वनाथ कसबे याला स्थानिम गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. तर त्याचा साथीदार अमोल रावसाहेब बिटनोर (रा. मांजरी, ता. राहुरी, जि. नगर) हा फरार झाला आहे. एलसीबीने गेल्या महिन्यात ५ गावठी कट्टे व ९ जिवंत काडतुसे जप्त



केले आहेत. यापुढेही कारवाई अशीच सुरु राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

सदरीची कारवाई ही पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक समीर अभंग,दिपक घाटकर,हृदय घोडके, सोमनाथ झांबरे, भिमराज खर्से, शाम जाधव यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

# महानगरपालिका निवडणुकीतील स्वीकृत नगरसेवक बाबासाहेब नागरगोजे यांचा सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महानगरपालिका निवडणुकीत स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल बाबासाहेब नागरगोजे यांचा जाहीर सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. समाजकार्यातील त्यांच्या योगदानाची दखल घेत सत्यशोधक साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अनिल गायकवाड सर, संदीप नाना कापडे, निळकंठ उल्हारे मेजर, नितीन खंडारे सर, ज्योतीताई साठे, जयश्रीताई गायकवाड, संदेश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

# विद्युत महावितरणाच्या बिलांवरून शेतकरी संतप्त

## सौर प्रकल्प बसवूनही लाखोंची वीजबिले, ग्रामीण कार्यालयात ठिय्या आंदोलन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शासनाच्या सौर ऊर्जा योजनेवर विश्वास ठेवून लाखो रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांनाच अवाजवी वीजबिलांचा फटका बसत असल्याची धक्कादायक प्रकरणे जिल्ह्यात समोर आली आहेत. सौर प्रकल्प बसविल्यानंतर वीजबिलात बचत होण्याऐवजी उलट लाखोंची थकबाकी दाखवून वीजपुरवठा खंडित करण्याचे इशारे दिले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी महावितरणच्या ग्रामीण उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडून संबंधित प्रकरणांची तातडीने तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली.

३ किलोवॅट सौर प्रकल्पानंतरही हजारोंची थकबाकी

टाकळी काझी येथील शेतकरी श्रीमंत उर्फ सचिन म्हस्के यांनी महावितरणची विधिवत परवानगी घेऊन ३



किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारला. सौर ऊर्जेमुळे वीजबिलात मोठी घट होण्याची अपेक्षा असताना, त्यांना उलट हजारोंची थकबाकी दाखवून अवाजवी बिल पाठवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. थकबाकी न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे देवगाव येथील शेतकरी गुलाब मोहन वामन यांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ३ किलोवॅट सौर प्रकल्प बसविला. मात्र त्यांना तब्बल ४ लाख ३२ हजार रुपयांचे अविश्वसनीय व तांत्रिकदृष्ट्या अशक्यप्राय

## दै. आकर्षण निवडक

### जिल्हा मराठा हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयात 'बॉलीवूड स्टार्स'



अहिल्यानगर- जिल्हा मराठा विद्या प्रसारक हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयामध्ये सालाबाद प्रमाणे फूड फेस्टिवल चे यावर्षीही उत्साहात आयोजन करण्यात आले. सदर महाविद्यालय अहिल्यानगर शहर परिसरामध्ये पंचतारांकित खाद्यसंस्कृतीमधील नवोपक्रम या फेस्टिवलच्या माध्यमातून रुजवण्याचे कार्य गेल्या पंचवीस वर्षापासून करत आहे. अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील खाद्य प्रेमींसाठी हा फेस्टिवल म्हणजे एक पर्वणीच असते.फूड फेस्टिवल २०२६ चे उद्घाटन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या खजिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे, सहसचिव मुकेशदादा मुळे, कार्यकारिणी सदस्य दीपक दरे, महाविद्यालयाचे संचालक डॉ. नंदकुमार जगताप, प्राचार्य योगिता सदरे, फेस्टिवलचे समन्वयक प्रा. बाळासाहेब शेंडगे, अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक प्रा. गोकुळ सोनावणे व सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. प्रत्येक वर्षी या फेस्टिवलचे आयोजन हे विविध थीमवर थीमनुसार असते. यावर्षी बॉलिवूड या थीमनुसार ९० च्या दशकातील विविध चित्रपट व सीने तारे यांचे फोटोग्राफ्स, पोस्टर्स व विविध बॅनर्स ने आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती व पाहुण्यांच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांनी विविध तारे तारकांचा पोशाख परिधान केलेला होता. बॉलीवूड मधील झगमगाट करून आकर्षक असे वातावरण निर्माण करण्यात आले होते. छायाचित्रे, पोस्टर्स, कट आउट वापरून छान डेकोरेशन करण्यात आले. पाहुण्यांसाठी रुचकर मेन्यू होता. यामध्ये स्वागत पेय गुप्त किवी मॅजिक मॉकटेल, स्टार्टर्स मध्ये जॉनी चाट कॉर्नर, बॉबीज चीज कॉन, जिद्दी फिश फिंगर, सूप मध्ये हीरो नंबर वन, मेन कोर्स मध्ये बादशहास पनीर टिक्का, व्हेज का अंदाज अपना अपना, फुल और काटे मटन, फिल्मी रोटी, नवाबो का पुलाव, डॉन कि मटण दम बिर्याणी, दिल से ग्रीन सलाड, खूबसूरत फ्रुट सलाड, बाजीगर पापड चाट रंगीला सलाड आणि मिठाई मध्ये ऑरेंज अँड चॉकलेट आशिकी, दिवाना रोल्स, धकधक आईस्क्रीम या व्यंजनांची रेलचेल होती.

### सावेडी येथे संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त हरिनाम सप्ताहात



अहिल्यानगर - सावेडी येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण कीर्तन सोहळा धार्मिक वातावरणात सुरू असून दुसऱ्या दिवशीचे पुष्प ह.भ.प. प्रांजलताई जाधव महाराज यांनी गुंफले. त्यांच्या कीर्तनातून संत विचार, संस्कार आणि समाज यांचे मोल अधोरेखित करत भाविकांची मने जिंकली.कीर्तनामध्ये ह.भ.प. प्रांजलताई जाधव यांनी नामदेवरायांच्या अभंगावर सुंदर निरूपण केले, "ब्रह्ममूर्ती संत जगी अवतरले, उद्धरावया आले दिनजना ब्रह्मादिक त्यांचे वंदिती पायवणी, नाम घेता वदनी दोष जाती" त्या म्हणाल्या, संत हे ब्रह्मरूप स्थितीत असतात. ते जगात अवतीर्ण होतात ते फक्त दिनदुःखींचा उद्धार करण्यासाठी. संत कृपेने विषयात आसक्त असलेलेही त्वरित उद्धरले जातात. म्हणून नामदेवरायांसारखे सत्संगाची, कीर्तनाची आणि नामस्मरणाची इच्छा आपल्यात असावी. त्या पुढे म्हणाल्या, आपण भाग्यवान आहोत की जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमन सोहळ्याच्या बीज उत्सवात सहभागी आहोत.संता घरची मर्यादा, कीर्तनातील संस्कार, आणि विचारांनी समाजाचे उत्थान घडविले.

# डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालयाचे हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबीर उत्साहात

### श्रमसंस्कार शिबिर विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त – सरपंच सखाराम सरक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिबिर २२ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नांदगाव ता. जि. अहिल्यानगर येथे संपन्न झाले. राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमा चे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण दांगडे यांनी प्रास्ताविकात सात दिवस राबवलेल्या उपक्रमाची माहिती दिली.

या शिबिरात शाश्वत विकासासाठी युवक- जलसंधारण, पडीक जमीन व्यवस्थापनावर विविध उपक्रम राबवण्यात आले, त्यामध्ये जलसंधारण अभियान, वृक्ष संवर्धन, ग्रामस्वच्छता, डिजिटल साक्षरता अभियान, शेती विषयक मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, बालविवाह प्रतिबंधात्मक जनजागृती, रस्ते दुरुस्ती, नव मतदार जनजागृती इत्यादी उपक्रम राबवण्यात आले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात सखाराम सरक यांनी स्वयंशिस्त, कष्टाची तयारी व परिस्थिती जाणीव हे त्रीसूत्री तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी श्रमसंस्कार शिबिर उपयुक्त असल्याचे व स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक नांदगाव चे लोकनियुक्त सरपंच यांनी केले. या शिबिराच्या समारोपप्रसंगी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. डॉ. दौलतराव नलावडे, प्रा. डॉ. विवेक निकम, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. जयश्री राऊत, डॉ. दीपिका मावळे, नांदगाव सोसायटीचे मा. चेअरमन तथा विद्यमान संचालक श्री. राजाराम पुंड, ग्रामपंचायत सदस्य नाथाभाऊ सरक, श्री.बाळू वर्पे, सौ.स्वातीताई वैभव आघाव, उद्योजक दत्तात्रय पुंड, श्री. विलास सोनवणे, डॉ. सतिश सोनवणे, ह.भ.प. संकपाळ महाराज, श्री.आबा पुंड आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. विलास सोनवणे उद्योजक तथा प्रगतशील शेतकरी यांनी पाणलोट क्षेत्र विकास व पडीक जमीन व्यवस्थापन या विषयाचे महत्त्व अधोरोकीत केले. तसेच श्री.बाळू वर्पे ग्रामपंचायत सदस्य यांनी म्हटले स्वयंसेवकांनी आपल्या उज्वल भविष्याच्या वाटचालीत समाज व राष्ट्राचे देणे लागते ही जाणीव कायम ठेवावी, फुल ना फुलाची पाकळी या भावनेतून जरी सेवा केली तरी समाजासाठी अत्यंत मोलाची ठरते. ग्रामीण भागातील जीवनशैली आदर्शवंत आहे याचा जवळून अनुभव घेण्याची सुवर्णसंधी स्वयंसेविकांना राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून मिळाली कृषीचे विद्यार्थी विविध क्षेत्रात वर्चस्व गाजवतात यामुळेच असे प्रतिपादन प्रा. जयश्री राऊत यांनी केले. प्रा. डॉ. दीपिका मावळे यांनी स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्री राजाराम पुंड मा.सरपंच यावेळी बोलताना म्हणाले राष्ट्रीय सेवा योजना केवळ एक सामाजिक उपक्रम नसून विद्यार्थ्यांना जीवनमूल्याची जाणीव करून देणारे प्रभावी व्यासपीठ असून या शिबिरामुळे सामाजिक बांधिलकी दृढ होते. या शिबिरासाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन चे संचालक (तंत्र) श्री. सुनील कल्हापुरे तसेच कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमांमध्ये स्वयंसेविका नम्रता पोपळघाट व तृप्ती भापकर यांनी आपले सात दिवसातील आलेल्या अनुभव कवितेतून सांगितले.

# सारडा महाविद्यालयात 'प्रयोगसिद्ध लोककला'

### आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभाग व संशोधन केंद्राने "प्रयोगसिद्ध लोककला"या विषयावरील आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते.पालघर येथील लोककलावंत घांगळीवादक श्री.सोनू म्हसे आणि तारपावादक श्री.मनोहर भोये यांच्या हस्ते घांगळीवादन आणि तारपावादन ,तसेच दीपप्रज्वलन करून या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.तर कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,मानद सचिव संजय जोशी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे बीजभाषण गुजरात येथून आलेले लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ. उत्तम पटेल यांनी केले.स्वागत आणि प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य माहेश्वरी गावित यांनी केले.यावेळी डॉ.गावित म्हणाल्या,"लोककला या समाजाचा सांस्कृतिक वारसा,परंपरा आणि सामाजिक अस्मिता दर्शवतात. लोककला या समाजाचे प्रतिबिंब असल्याने त्यांचे जतन करणे, ही काळाची गरज आहे. जागतिकीकरणाच्या युगात लोककला ही विविधतेची साक्ष देते.आणि मानवी सर्जनशीलतेचे प्रदर्शन करते. हे लोककलांचे महत्त्व लक्षात घेऊन प्रयोगसिद्ध लोककला या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ.उत्तम पटेल म्हणाले,"आदिवासी संस्कृती ही आपला वारसा आहे. तिचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे.या संस्कृतीचा देखावा आपण करू शकत नाही परंतु,समीकरण बदलले आहे. संगणक,उत्तर आधुनिकता,जनजागृती, मोबाईल, इंटरनेट,आर्थिक गरजा आणि बाजारपेठांमुळे भारतातील आदिवासी कलाकारांना आधुनिक माध्यमातून प्रसिद्धी आदर आणि पैसा मिळवता आला आहे.फेसबुक आणि युट्युब सारख्या माध्यमाद्वारे या कला इतर देशांमध्ये पोहोचल्या आहेत. यामुळे त्यांच्या कलेचे अवमूल्यन होता कामा नये. लोककलाकारांनी त्यांच्या कलेशी प्रामाणिक राहिले पाहिजे.त्यांच्यातील आदिम मन आजही जिवंत आहे.आणि जोपर्यंत आदिम मन आहे तोपर्यंत लोककला अशीच राहील.

उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी प्रयोगसिद्ध लोककला या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रा सारख्या उपक्रमाचे कौतुक केले आणि चर्चासत्राला शुभेच्छा दिल्या. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन पाहुण्यांचा परिचय आणि आभारप्रदर्शन डॉ.नवनाथ भोंदे यांनी केले.

दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ.संजय बोरुडे तर तज्ज्ञ साधन व्यक्ती लोककलेचे ज्येष्ठ अभ्यासक भगवान राऊत हे होते. यावेळी भगवान राऊत यांनी सामूहिक लोककलांचे विवरण केले.तसेच लोककलावंतांची आणि लोककलांची होणारी उपेक्षा याविषयी खंत व्यक्त करून लोककलांचे जतन व संवर्धन करणे आवश्यक असल्याचे मत मांडले.

# श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा पाठ कार्यक्रमास श्री विशाल गणेश मंदिरातून भक्तिमय प्रारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हनुमान चालीसा पाठ व भक्ती संध्या मालिकेचा शुभारंभ शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. हनुमान जयंतीपर्यंत नगर शहरातील विविध भागांमध्ये हनुमान चालीसा पाठ, सामूहिक पठण तसेच भक्ती संध्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाचा प्रारंभ श्री विशाल गणेश मंदिराच्या पवित्र प्रांगणात मोठ्या श्रद्धा, उत्साह आणि भक्तिभावाने करण्यात आला. यावेळी मंदिराचे महंत संगमनाथ महाराज, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त नितीन पुंड यांच्यासह श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाचे रामविलास हेडा, राहुल सारडा, अविनाश बिहाणी, विष्णु सारडा, संजय सारडा, दिलीप चंगेडीया, महेश बिहाणी, बाळासाहेब आगरकर, गणेश राऊत, गणेश पितळे व पदाधिकारी व कार्यकर्तेमोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी सचिव अशोकराव कानडे व सौ. वंदना कानडे यांच्या हस्ते विधीवत पुजा करण्यात आली. मंदिर परिसरात सुरुवातीपासूनच धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित भाविकांनी एकत्रितपणे हनुमान चालीसा पठण करत प्रभू श्रीरामाचे परमभक्त हनुमान यांच्या चरणी भक्तीभाव व्यक्त केला. सामूहिक पठणामुळे संपूर्ण परिसर 'जय हनुमान'च्या घोषणांनी दुमदुमून गेला आणि वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले.

या हनुमान चालीसा पाठ कार्यक्रमात शहरातील विविध भागांतील असंख्य महिला-पुरुष, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सामूहिक पठणादरम्यान भाविकांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि एकाग्रतेने सहभाग घेतला. एकाच स्वरात झालेले पठण हे उपस्थितांसाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारे ठरले.

यानंतर आयोजित करण्यात आलेल्या भक्ती संध्या कार्यक्रमात विविध भक्तिगीते व भजने सादर करण्यात आली. भजनांच्या सुरेल सादरीकरणामुळे वातावरण अधिकच भारावून गेले. अनेक भाविक भजनांच्या तालावर तल्लीन होत भक्तिरसात रंगून गेले होते.

कार्यक्रमाच्या शेवटी मंदिराचे महंत संगमनाथजी महाराज यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी बोलताना महंत संगमनाथजी महाराज म्हणाले की, हनुमान चालीसा हे केवळ स्तोत्र नसून ते प्रत्येकाच्या जीवनातील संकटांवर मात करण्याचे एक प्रभावी साधन आहे. सामूहिक पठणातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा संपूर्ण वातावरण शुद्ध करते आणि प्रत्येकाच्या मनात आत्मविश्वास, धैर्य आणि श्रद्धा निर्माण करते. आजच्या धावपळीच्या जीवनात अध्यात्माची जोड अत्यंत आवश्यक आहे.

यावेळी बोलताना अशोकराव कानडे म्हणाले की, हनुमान भक्तीमुळे व्यक्तीमध्ये सेवा, त्याग आणि निस्वार्थ भाव वाढीस लागतो. युवकांनी अशा धार्मिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन संस्कार जोपासले पाहिजेत. समाजात एकोपा, शांतता आणि सद्भावना प्रस्थापित करण्यासाठी सामूहिक प्रार्थना आणि भक्तीचे कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरतात. हनुमान जयंतीपर्यंत सुरू राहणार्या या उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद द्यावा.

# दिल्लीतील भारतमंडपम आयोजित कार्यक्रमात राजेश देशपांडे यांचा सन्मान




**नवी दिल्ली :** अहिल्यानगरचे अर्थतज्ज्ञ राजेश देशपांडे यांनी मांडलेला आर्थिक कौशल्य विकासाचा मुद्दा देशभरातील शेतकर्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून शेतकरी हिताच्या प्रत्येक सूचनेचे केंद्र सरकार स्वागत करते, असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी नवी दिल्ली येथील भारतमंडपम येथे आयोजित मेकिंग इंडिया फ्युचर रेडी कार्यक्रमात बोलताना केले.

बीएस समूहातर्फे आयोजित मेकिंग इंडिया फ्युचर रेडी कार्यक्रम नवी दिल्ली येथील भारतमंडपममध्ये दोन दिवस झाला. या शिखर परिषदेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय वाणिज्यमंत्री पियुष गोयल, केंद्रीय रिन्यूएबल एनर्जी खात्याचे मंत्री प्रल्हाद जोशी, पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष प्रोफेसर महेंद्र देव, नीती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी व ऋ शेरपा अमिताभ कांत यांच्यासमवेत देशभरातील दोनशेहून अधिक शेतीतज्ज्ञ, उत्पादक, अर्थतज्ज्ञ, भांडवलदार व स्टार्टअपचे संस्थापक उपस्थित होते.

या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेला केंद्रस्थानी ठेवून अर्थ, शेती, उत्पादन, संरक्षण व पायाभूत सुविधा या विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली होती. यामध्ये उपस्थित तज्ज्ञांच्या शंका व सूचनांचे केंद्रीय मंत्र्यांकडून अवलोकन करण्यात आले. यावेळी विविध वक्त्यांनी मांडलेल्या वेगवेगळ्या भारत सुधारणा सूचनांचे त्यांच्याकडून स्वागत करण्यात आले.

# आरोग्य ग्राम जखणगाव येथे विशेष शिवआरोग्य योजना कार्यान्वित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आरोग्यदायी गाव म्हणून राज्यातच नव्हे तर देशात ओळख असलेल्या आपल्या आरोग्य ग्राम जखणगाव ता जि अहिल्यानगर येथे ग्रामसंसद कार्यालय,प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व गावातील बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत रजिस्टर असणारे हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या शिवजयंतीपासून पुढील शिवजयंती पर्यंत विशेष अशी शिवआरोग्य संवत्सर योजना कार्यान्वित केली जाणार आहे.

या योजनेअंतर्गत गावातील प्रत्येक नागरिकांकडून त्याच्या संपूर्ण आरोग्यासाठी एक वर्ष कालावधीसाठी रुपये पाचशे किंवा त्याच्या शेतीत पिकवलेले कोणतेही पाच पायल्या धान्य किंवा कुठल्याही प्रकारची त्यांच्या फळबागातील २५ किलो फळे किंवा ५० किलो भाजीपाला यापैकी कोणतेही एक संकलन वार्षिक दान म्हणून संकलन केले जाणार असून या मोबदल्यात जखणगांवमधील त्या व्यक्तीला पूर्ण वर्षभर संपूर्ण आरोग्य प्राप्ती साठी उपचार मोफत केले जाणार आहेत. यामध्ये त्याला लागणाऱ्या रक्त लघवीच्या चाचण्या, डिजिटल ऑनलाईन एक्स-रे,इसीजी, उपलब्ध सर्व प्रकारची औषधे व काही प्रमाणात अँटिबायोटिक, सलाईन,इंजेक्शन्स तसेच बीपी, शुगर,संधिवात, दमा,हृदयरोग, मेंदूरोग यासारख्या आजारावरील औषधे या उपक्रमाअंतर्गत पूर्ण एक वर्ष म्हणजे एक संवत्सर मोफत दिली जाणार आहेत. ही योजना वरील पैकी एक गोष्टीचे संकलन केल्यावर त्वरित लागू होइल व तेव्हापासून पुढील शिवजयंती पर्यंत लागू राहील.

उशिरा नोंदणी केल्यासही ही योजना पुढील शिवजयंती पर्यंतच लाभदायी राहिल. याशिवाय डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे गावातीलच सर्व अधिकृत मेडिकल स्टोअर्स मध्ये या उपक्रमांतर्गत सवलतीच्या दरात मिळतील.ज्या गावाकऱ्यांना उपलब्ध नसलेल्या तपासण्या व उपचार नगर, पुणे किंवा इतरत्र घ्याव्या लागतील त्यातही जास्तीत जास्त सवलत मिळवून देण्यात येईल. या दोन्ही उपचारासाठी गावांतर्गत अधिकृत केंद्रात व हॉस्पिटल्स मध्ये सेवा मोफत दिल्या जातील. प्रसूती व इतर सेवा सुद्धा या उपक्रमात पूर्णतः मोफत केल्या जातील.

याशिवाय आजार व अपघात यात अत्यावश्यक वैद्यकीय सेवा सुद्धा मोफत दिल्या जातील.आधुनिक उपचार पद्धती बरोबरच आयुर्वेद, होमिओपॅथी,युनानी, योगा, निसर्गपचार व प्राकृतिक चिकित्सा सुद्धा केल्या जातील. नाव नोंदणी केल्यावर प्रत्येक नागरिकांस विशिष्ट कार्ड देण्यात येईल. ते कार्ड फक्त सोबत आणल्यास वर्षभर सर्व उपलब्ध उपचार व निदान मोफत केले जातील.

हा आगळावेगळा उपक्रम १०० % यशस्वी होइल कारण यापूर्वीही गावात संपूर्ण कुटुंब आरोग्य योजना यशस्वीपणे राबविण्यात आली होती. तरी सर्व ग्रामस्थांनी त्वरित आरोग्य उपकेंद्र, ग्रामपंचायत किंवा हॉस्पिटलशी संपर्क करावा.

# होळी हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक – दत्तात्रय कावरे

### जुनी वसंत टॉकीज चौकातील संगम तरुण मंडळाची ५००१ गोवऱ्यांची आकर्षक होळी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जुनी वसंत टॉकीज चौक परिसरात संगम तरुण मंडळाच्या वतीने यंदा इंदोरच्या धर्तीवर तब्बल पाच हजार एक गोवर्यांची आकर्षक होळी प्रज्वलित करण्यात आली. विशेष म्हणजे या होळीसाठी केवळ गोवर्यांचाच वापर करण्यात आला असून कोणत्याही लाकडाचा वापर न करता पारंपरिक पद्धतीने ही होळी उभारण्यात आली होती. आकर्षक सजावट आणि पारंपरिक रचनेमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

होळी प्रज्वलनाचा कार्यक्रम मंत्रोच्चारांच्या गजरात व भक्तिमय वातावरणात पार पडला. परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच बालगोपाळांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून होळीचे दर्शन घेतले. संगम तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अनेक दिवसांच्या परिश्रमातून ही भव्य होळी साकारली होती. मंडळाचे मार्गदर्शक नगरसेवक दत्तात्रय कावरे, मंडळाचे अध्यक्ष ऋषिकेश कावरे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्तेयावेळी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शक नगरसेवक दत्तात्रय कावरे यांनी सांगितले की, होळी हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. प्रह्लादाच्या भक्तीमुळे होलिकेचा अंत झाला, यामागे सत्य आणि श्रद्धेचा संदेश आहे. होळी साजरी करण्यामागील उद्देश म्हणजे आपल्या मनातील मत्सर, द्वेष, अहंकार या नकारात्मक भावनांचा त्याग करून नव्या उत्साहाने आणि सकारात्मकतेने जीवनाची सुरुवात करणे. समाजात ऐक्य, बंधुभाव आणि सद्भावना वाढविण्यासाठी हा सण प्रेरणा देतो.

तसेच पुढे ते म्हणाले, पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरे करणे ही आजची गरज आहे. केवळ गोवर्यांचा वापर करून उभारलेली ही होळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी आहे. सणांच्या माध्यमातून समाजात एकोपा वाढवणे, परंपरा जपणे आणि पुढील पिढीला संस्कार देणे हे आपले कर्तव्य आहे. संगम तरुण मंडळाने घेतलेली पुढाकार निश्चितच अनुकरणीय असून नागरिकांनीही अशा विधायक उपक्रमांना सहकार्य करावे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### मांजरसुंभा गडावर शनिवारी अकरा हजार एकशे अकरा हनुमान चालीसा प्रकाशन सोहळा



अहिल्यानगर - तालुक्यातील मांजरसुंभा गड येथे गुरु गोरक्षनाथ मंदिराचा कलशारोहण सोहळा शनिवार, दिनांक ७ मार्च रोजी मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या सोहळ्यास गुरुवर्य महंत रामगिरी महाराज (सरला बेट गोधाधाम) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी महंत रामगिरी महाराज यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून, धार्मिक वातावरणात भक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन लाभणार आहे. या सोहळ्यात जागतिक पर्यावरण विकास सरकार या संस्थेच्या माध्यमातून ११,१११ प्रती हनुमान चालीसांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. यासोबतच १ कोटी ११ लाख ११ हजार १११ श्रीराम व हनुमान भक्तांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प संस्थेचे अध्यक्ष गोरक्षनाथ गवते यांनी व्यक्त केला आहे. प्रत्येक घरामध्ये दिवसातून किमान एकदा तरी हनुमान चालीसा पठण व्हावे, यासाठी जनजागृती केली जाणार असून धार्मिक साधनेसोबत सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा संदेश दिला जाणार आहे. पर्यावरण रक्षण ही आजच्या काळाची अत्यंत गरज असल्याचे गोरक्षनाथ गवते यांनी नमूद केले. ''आज झाडे वाचली तर सजीव सृष्टी वाचेल आणि सजीव सृष्टी वाचली तर पर्यावरण वाचेल,'' असे सांगत त्यांनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्थेमार्फत ''एक झाड एक विद्यार्थी, एक झाड एक व्यक्ती'' ही संकल्पना राबवली जात आहे. यासोबतच कुऱ्हाडबंदी, डीजे बंदी, हुंडाबंदी, लोटाबंदी, आकडाबंदी, खाजगी सावकारबंदी, व्यसनबंदी, तंटाबंदी, शिकारबंदी, प्लास्टिकबंदी, भ्रष्टाचारबंदी, बेरोजगारीबंदी अशा विविध सामाजिक मोहिमा राबविण्यात येत आहेत. तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव, विषमुक्त शेती, रोगमुक्त भारत, भू-प्रदूषणबंदी, जलप्रदूषणबंदी व वायूप्रदूषणबंदी या संकल्पनांद्वारे स्वच्छ, सुंदर व निरोगी भारत घडविण्याचा संस्थेचा निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी शंकरराव कदम, जयराम कदम, गोरक्षनाथ कदम, मारुती कदम, जालिंदर कदम, तुकाराम कदम, आसाराम कदम, भाऊसाहेब कदम, भास्कर कदम, नारायण कदम, विलास भुतकर, पोपटराव पटारे, निलेश साठे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### निमगाव वाघात पर्यावरणपूरक होळी



अहिल्यानगर- निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान राबवून पर्यावरणपूरक पद्धतीने होळी साजरी करण्यात आली. गावातील बिरोबा देवस्थान परिसरात पाला-पाचोळ्याची होळी पेटवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमांतर्गत उपस्थित युवकांना पर्यावरण रक्षण व व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. विशेष म्हणजे, मागील सोळा वर्षांपासून गावात हा सामाजिक उपक्रम सातत्याने राबविला जात असून, युवकांसाठी जनजागृतीसाठी एक प्रेरणादायी सोहळा बनला आहे. होळीपूर्वी देवस्थान परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा आदी व्यसनाधीन पदार्थांचे होळीत दहन करण्यात आले. ''व्यसनांची होळी करा आणि निरोगी जीवनाचा संकल्प करा'' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पर्यावरणाचा बिकट होत चाललेला प्रश्न आणि युवकांमध्ये वाढते व्यसनाचे प्रमाण चिंताजनक आहे. तंबाखू, विडी-सिगारेटमुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत असून दारूमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. होळीसाठी हिरवी झाडे तोडून लाकूड जाळण्याऐवजी वाळलेला पाला-पाचोळा वापरल्यास पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करता येतो, असे त्यांनी स्पष्ट केले. युवकांनी पुढाकार घेऊन गावात व्यापक स्वच्छता मोहीम राबवावी, त्यामुळे गाव निर्मळ व निरोगी राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## डॉ.पाऊलबुधे अध्यापक विद्यालय क्रीडा सांस्कृतिक स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप मानकरी ठरला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा अंतर्गत अध्यापक विद्यालयांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धांचे आयोजन डॉ.ना.ज.पाऊलबुधे अध्यापक विद्यालय येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डाएट चे प्राचार्य डॉ.राजेश बनकर होते. तसेच कार्यक्रमास प्रमुख पाहुणे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामकिसन देशमुख यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगितले.

प्रमुख उपस्थिती म्हणून संगमनेर डाएटचे वरिष्ठ अधिव्याख्याता श्री.लक्ष्मण सुपे, अधिव्याख्याता श्री.मुकुंद दहिफळे, डाएट चे सांख्यिकी सहाय्यक श्री. नितीन टिळेकर, लघुलेखक श्री.आशिष राऊत उपस्थित होते.

स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील विविध अध्यापक विद्यालयांतील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या जिल्हास्तरीय स्पर्धेत डॉ.ना. ज.पाऊलबुधे अध्यापक विद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये बक्षिसे मिळवली.यामध्ये रांगोळी स्पर्धेत माया त्रंबके हिने प्रथम क्रमांक, निबंध स्पर्धेत मृणाली नजन प्रथम क्रमांक, पोस्टर्स स्पर्धा द्वितीय क्रमांक कोमल नढे, समूह गायन स्पर्धा तृतीय क्रमांक (प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी संघ) थाळी फेक स्पर्धेत आरती लोखंडे द्वितीय क्रमांक, तर गोळा फेक मधे गंणगे गणेश याने द्वितीय क्रमांक मिळवला. ८.१०० मीटर धावणे स्पर्धेत मयुरी राऊत हिने तृतीय क्रमांक मिळवला.

सर्वात जास्त गुण पाऊलबुधे अध्यापक विद्यालयास मिळाल्यामुळे मुलींना जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी प्रदान करण्यात आली. सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अध्यापक विद्यालयाच्या व संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.आणि बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्या सविता सानप, विविध विभागांचे प्राचार्य तसेच प्रा.मीरा डिमळे व सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्रीडा सांस्कृतिक स्पर्धेत अध्यापक विद्यालयाने मिळवलेल्या जनरल चॅम्पियनशिपचे यशाबद्दल सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ आदींनी सर्व विद्यार्थी, शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

### आदर्श गाव मांजरसुंबा येथे

## चैतन्य गोरक्षनाथ गड मंदिर कलशरोहननिमित्त तीन दिवसीय कीर्तन सोहळ्यास प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आदर्श गाव मांजरसुंबा येथे असलेल्या चैतन्य गोरक्षनाथ गड मंदिर येथे कलशरोहन कार्यक्रमानिमित्त तीन दिवसीय कीर्तन सोहळ्याचा शुभारंभ मोठ्या धार्मिक उत्साहात झाला. कार्यक्रमाची सुरुवात खासदार निलेश लंके यांच्या हस्ते ध्वजपूजनाने झाली. या वेळी ह.भ.प. ईश्वर महाराज कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नवनाथ पारायण सोहळ्याला सुरुवात झाली असून भाविक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित आहे.

सोहळ्याच्या निमित्ताने विविध संतांची कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. आज सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील यांचे कीर्तन होणार आहे. ५ मार्च रोजी ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे यांचे कीर्तन, ६ मार्च रोजी गुरुवर्य जंगले महाराज शास्त्री यांची कीर्तन सेवा पार पडेल. तर ७ मार्च रोजी महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते कलशरोहन सोहळा पार पडेल, आणि त्यानंतर काल्याचे कीर्तन होणार आहे. या संपूर्ण सोहळ्याचे आयोजन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शंकर कदम आणि सचिव गोरक्षनाथ कदम यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, भाविक भक्तांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ध्वजपूजन कार्यक्रमात बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, श्री क्षेत्र गोरक्षनाथ देवस्थान हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. राज्यभरातून भाविक येथे येतात, त्यांच्या सुविधा वाढवण्यासाठी दोन कोटी रुपयांचा विकास प्रस्ताव तयार आहे आणि तो अंतिम टप्प्यात आहे. मी प्रामाणिकपणे प्रयत्न करतोय की आपल्या जिल्ह्यातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रांना दोन कोटी रुपयांचा निधी मिळावा. सरकारमध्ये काही अडचणी असतात, पण देवाच्या कृपेने काट्यातूनही मार्ग निघतो. आम्ही नाथांच्या भूमीत जन्मलो आहोत; नाथांचा प्रवास किती खडतर होता हे आपल्याला माहीत आहे.

आपल्यालाही त्या खडतर वाटेवरून मार्ग काढून गोरक्षनाथ देवस्थानाचे रूपांतर 'नंदनवनात' करायचे आहे. देवस्थान ट्रस्ट प्रामाणिकपणे काम करत आहे. गावकऱ्यांनी एकजुटीने राहून देवस्थानचा चेहरामोहरा बदलावा. मी अध्यात्मिक माणूस आहे देवाच्या दारात कधीच राजकारण केले नाही.

देवाचा दरबार म्हणजे ड्रोन कॅमेरा आहे तो सगळ्यांचा हिशोब ठेवतो! त्यामुळे श्रद्धेने काम करा; देव कोणालाही माफ करत नाही, पण जे प्रामाणिक असतात त्यांना तो नेहमीच साथ देतो. खासदार लंके पुढे म्हणाले की, ज्या गावातील मंदिरे सुदृढ आहेत ते गाव गुण्यागोविंदाने नांदतात.

ज्या गावातील मंदिरे दुर्लक्षित आहेत तिथे भांडणे आणि किरकोळ वाद निर्माण होतात. त्यामुळे श्रद्धास्थानांचे जतन हेच गावाच्या ऐक्याचे प्रतीक आहे. राजकारणाला देवाच्या दारात स्थान नाही श्रद्धा, एकजूट आणि विकास या त्रिसूत्रीवर काम करणे गरजेचे आहे. या वेळी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे म्हणाले, श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड हे आमच्या तीन पिढ्यांचे श्रद्धास्थान आहे.

### राजदेव यांच्या पुढाकारातून टाकळी ढोकेश्वर येथे

## महाआरोग्य शिबिराबाबत पत्रक व खाऊ वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच देशाचे ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्र पवार यांच्या राजकारणातील ६० वर्षांच्या उल्लेखनीय कारकिर्दीच्या निमित्ताने आणि स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित महाआरोग्य शिबिराचे आयोजन ८ व ९ मार्च रोजी करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना महाआरोग्य शिबिराबाबत माहिती देणारी पत्रके वाटप करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचेही वाटप करण्यात आले तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमावेळी टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते रविंद्र राजदेव, राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहनराव रोकडे, तालुका राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष अंकुश पायमोडे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे अध्यक्ष मळीभाऊ रांधवण, विक्रम झावरे, विलास ठुबे, नांदूर पठारचे माजी सरपंच भानुदास आग्रे, जनार्दन चौधरी, रविंद्र चौधरी, रामदास राजदेव, प्रणव पानसरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला पत्रक देऊन खाऊ वाटप करण्यात आले आणि महाआरोग्य शिबिराला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

## महिला दिनी नवनिर्वाचित महापौर व नगरसेविकांचा सत्कार

**। शालिनी वाबळे यांचा पुढाकार; प्रभाग क्र. २ व ३ मधील महिलांची मोठी उपस्थिती**
**। एकविरा रस्ता लवकर पूर्ण करण्याची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सौ. शालिनी मनसुख वाबळे यांच्या तर्फे नवनिर्वाचित महापौर व नगरसेविकांचा सत्कार समारंभप्रसंगी महापौर ज्योती गाडे, नगरसेविका संध्या पवार नगरसेविका रोशनी त्रिंबके, गौरी बोरकर,शहर राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष श्रीमती रेश्मा आठरे, माजी नगर सेविका शोभा बोरकर, सौ. शालिनी वाबळे, छाया राजपूत, सविता मोरे, सौ. राजश्री शितोळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाला प्रभाग क्र. २ व ३ मधील नगरसेविका, महिला पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत नारी शक्तीचा गौरव केला.

कार्यक्रमात सौ. शालिनी ताई वाबळे यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. स्थानिक निवडणुकीतून माघार घेऊन त्यांनी दिलेला जाहीर पाठिंबा तसेच प्रभागातील विकासासाठी त्यांनी केलेल्या विविध उपक्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले. प्रभाग क्र. ३ मधील सामाजिक कार्यामुळे त्यांना महिलांमध्ये विशेष मान व पाठिंबा मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

नवनिर्वाचित महापौर सौ. ज्योती गाडे यांनी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिलांना शुभेच्छा देत नारी शक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. ''समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध केली असून त्यांच्या सहभागामुळे समाज अधिक सक्षम होत आहे,'' असे त्यांनी सांगितले.

तसेच परिसरातील नागरिकांनी मांडलेल्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

सौ. शालिनी ताई वाबळे यांनी आपल्या मनोगतातून सर्व महिलांचे आभार मानले. ''महिलांनी एकत्र येऊन समाजाच्या विकासासाठी काम केले तर अनेक सकारात्मक बदल घडू शकतात. महिलांची एकजूट हीच समाजाची खरी ताकद आहे,'' असे त्यांनी नमूद केले.यावेळी त्यांनी उपनगरातील कचऱ्याचा प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी केली. तसेच एकविरा ते दरम्यानचा मुख्य रस्ता गेल्या वर्षभरापासून रखडलेला असून तो लवकर पूर्ण करावा, अशी मागणी त्यांनी महापौर व नगरसेविकांकडे केली.

या रस्त्यावरील धूळ व खडीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून स्थानिक व्यापाऱ्यांचे व्यवसायही प्रभावित होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

प्रास्ताविक मनसुख वाबळे यांनी केले. अनेक महिलांनी आपल्या मनोगतातून आमदार संग्राम भैय्या जगताप व महापौर यांच्याकडे वाबळे कुटुंबातील सदस्याला स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देण्याची विनंती केली.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सागर वाबळे, कांचन वाबळे, हॉटेल रुट्स चे मॅनेजर अमोल आढाव यांनी परिश्रम घेतले. कुमार नवले, प्रभाग क्र. २ व ३ मधील नगरसेविका व महिला, विद्या कॉलनी, नवले नगर, नरहरी नगर, सरस्वती कॉलनी, आसरा सोसायटी, समर्थ कॉलनी, कोहिनूर मंगल कार्यालय परिसर, समता नगर, राजमाता कॉलनी, पंकज कॉलनी, आनंद नगर, वृद्धेश्वर कॉलनी या सर्व ठिकाणच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बाबासाहेब बोडखे यांचा आमदार संग्राम जगताप यांच्याकडून सत्कार

**स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या सानिध्यात घडलेले बोडखे हे समाजकारणी शिक्षक –आ.संग्राम जगताप**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब बोडखे यांची नियुक्ती झाल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी शहर सहकारी बँकेचे व्हाइस चेअरमन प्रा. माणिक विधाते, नगरसेवक विकी जगताप, विशाल नाकाडे, आंधळे, प्रा. रावसाहेब चौधरी, महेश दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, बाबासाहेब बोडखे हे माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक असून संघटनात्मक कार्यात त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिला आहे. शिक्षकांच्या वेतन, सेवा अटी, बदली, निवृत्तीवेतन आदी विविध प्रश्नांवर त्यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या सानिध्यात घडलेले ते समाजकारणी शिक्षक आहेत. गोरगरीब व दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ते सातत्याने मदत करत असून, अनेक वंचित घटकांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व त्यांनी स्वीकारले आहे. शिक्षण क्षेत्रात सामाजिक वसा जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करत असल्याचे सांगून आमदार जगताप यांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, बाबासाहेब बोडखे यांनी शिक्षकांच्या प्रश्नांवर सातत्याने ठाम भूमिका मांडत संघटनात्मक ताकद वाढवली आहे. ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी झालेली त्यांची नियुक्ती ही त्यांच्या कार्याची पावती आहे. ''बोडखे यांनी केवळ पदासाठी नव्हे, तर शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रशासनाशी प्रभावी संवाद साधला. संघर्षशील व अभ्यासू नेतृत्व म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.''

बाबासाहेब बोडखे यांच्या नियुक्तीमुळे ग्रामीण भागातील शिक्षकांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे न्याय मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. सत्कार सोहळ्यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## अहमदनगर कॉलेजमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा; डॉ. दिनेश सावंत यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर येथील डॉ. जॉन बार्नबस पोस्ट ग्रॅज्युएट स्कूल फॉर बायोलॉजिकल स्टडीज यांच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. लायब्ररी कॉन्फरन्स हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमास प्राध्यापक, संशोधक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम बी.पी.एच.ई. सोसायटीचे चेअरमन डॉ. आर. जे. बार्नबस, सेक्रेटरी डॉ. विशाल बार्नबस तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. डॉ. आर. डी. टाक, प्राध्यापक व रसायनशास्त्र विभागप्रमुख यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी २८ फेब्रुवारी रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व अधोरेखित करत सर सी. व्ही. रमण यांनी १९२८ मध्ये लावलेल्या 'रमण परिणाम' या ऐतिहासिक शोधाची आठवण करून दिली. '' : '' या यावर्षीच्या विषयावर भाष्य करत त्यांनी राष्ट्रनिर्मितीत महिला वैज्ञानिकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले. विकसित भारताच्या उभारणीसाठी संशोधन, नवकल्पना, नेतृत्व आणि विज्ञानधोरणामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. टाक यांनी विभागाची ओळख करून देताना सांगितले की, रसायनशास्त्र विभागाला डॉ. जॉन बार्नबस पोस्ट ग्रॅज्युएट स्कूल फॉर बायोलॉजिकल स्टडीज म्हणून मान्यता असून सध्या सात मान्यताप्राप्त मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली २१ संशोधक पीएच.डी. शिक्षण घेत आहेत. संशोधनाची समृद्ध परंपरा असलेल्या या विभागाने अनेक गुणवंत संशोधक घडविले असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

यावेळी त्यांनी प्रख्यात वैज्ञानिक डॉ. जॉन बार्नबस (१९२९१९९४) यांच्या कार्याची उजळणी केली. आण्विक वर्गीकरण व उत्क्रांतीशास्त्र क्षेत्रातील त्यांचे संशोधन जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त ठरले. त्यांनी केंद्र सरकारच्या विज्ञान सल्लागार समिती तसेच जैवतंत्रज्ञान विभागात महत्त्वाची भूमिका बजावली. १९७४ मध्ये त्यांना जैवविज्ञान क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सीएसआयआरचा प्रतिष्ठित 'शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार' प्रदान करण्यात आला होता. महाराष्ट्रातील शिक्षक म्हणून हा सर्वोच्च सन्मान मिळविणाऱ्यांमध्ये त्यांचा अग्रक्रम होता, याचा संस्थेला अभिमान असल्याचे डॉ. टाक यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. दिनेश सावंत, वरिष्ठ शास्त्रज्ञ, सीएसआयआरएनसीएल, पुणे व अहमदनगर कॉलेजचे माजी विद्यार्थी यांनी अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणाची सुरुवात त्यांनी शाळेपासून पदवीपर्यंतच्या शैक्षणिक प्रवासाच्या आठवणींनी केली. ग्रामीण पार्श्वभूमीतून उच्च शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करताना आलेल्या अडचणी, जिद्द, परिश्रम आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच आपण यशस्वी होऊ शकलो, असे त्यांनी सांगितले. पदवी शिक्षणातील प्राध्यापकांनी दिलेली शिस्त, विषयातील गती आणि विद्यार्थ्यांवरील विश्वास यामुळे संशोधन क्षेत्रात पाऊल ठेवण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

# स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या अद्वितीय यशामूळे शाळेच्या नावलौकिकात भर – मधुसुदन सारडा

**स्टुडंट टॅलेंट सर्च परीक्षेत हिंदसेवाचे । २६ विदयार्थी जिल्हास्तरीय व केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत चमकले**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदसेवा मंडळाची प्राथमिक शाळा बागडपट्टी विभागाचे २५ विदयार्थी स्टुडंट टॅलेंट सर्च या स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकले. जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता पहिली –शेख माहेनूर शाहरुख –जिल्हात सहावी आली. इयत्ता दुसरी मधील समृध्दी पठारे –जिल्हयात दुसरी,गीत जपे– जिल्हयात तिसरी, शेख अम्मारा – जिल्हयात चौथी, बेरड अमृता – जिल्हयात पाचवी,कदम दिव्या –जिल्हयात सहावी, शेख अल्तमश– जिल्हयात सातवा क्रमांक मिळविला.

इयत्ता तिसरी मधील शेळके सेजल –जिल्हयात पंधरावी,लाड सर्वेश –जिल्हयात पंधरावा. इयत्ता चौथी मधील म्हस्के चिन्मय–जिल्हयात चौथा, ताकपेरे जिविका–जिल्हयात सोळावी,नलगे शिवम – जिल्हयात सतरावा, केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता पहिली मधील बागवान तहुरा – केंद्रात पहिली, शेख सारा – केंद्रात दुसरी, शेख मुबशिरा – केंद्रात तिसरी, शेख आस्मा– केंद्रात पाचवी, इयत्ता दुसरी मधील धायतडक सृष्टी – केंद्रात पहिली, जावळे कार्तिक –केंद्रात दुसरा,आगळे सोहम–केंद्रात तिसरा, इयत्ता तिसरी मधील श्रावणी जाधव–केंद्रात पहिली, गंगावणे विश्वजित–केंद्रात दुसरा,कलंके तन्वी–केंद्रात तिसरी इयत्ता चौथी मधील शेख सिमरा–केंद्रात पहिली,ढेरे सत्यजित –केंद्रात तिसरा,कांबळे अर्णवी –केंद्रात चौथी, खेडकर आदिती–केंद्रात पाचवी अशा २६ विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवले आहे.

स्पर्धा परीक्षेसाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे तसेच शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन करीत असतात.स्पर्धा परीक्षेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय व केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत मोठे यश मिळविले आहे.यामुळे हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचा नावलौकिकात भर पडली आहे. असे गौरवोद्गार शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी काढले. सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतूक संस्थेचे अध्यक्ष शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी केले.

स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे,सौ.मनिषा साळी ,सौ.सासवडकर अंजली,पठाण मुदस्सिर,सौ.धाडगे अरुणा, सौ.पोतदार विदया, अभिजित जवादे,श्रीम.जंगम मनिषा, सौ.चावरे कल्पना आदींचे मार्गदर्शन लाभले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल २५ वर्षांची अखंड रुग्णसेवा मानवसेवेचा आदर्श मॉडेल - मिलापचंद पटवा

**जनरल सर्जरी शिबिराचे उद्घाटन; ६० रुग्णांची मोफत तपासणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मागील पंचवीस वर्षांपासून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने रुग्णसेवा अविरत सुरू आहे. या सेवेत कार्य करण्याचे भाग्य लाभल्याचा आनंद होत असून सर्वसामान्य रुग्णांची काळजी घेऊन हॉस्पिटलने नागरिकांचा मोठा विश्वास संपादन केला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे रुग्णसेवेचे आदर्श मॉडेल ठरले असल्याचे प्रतिपादन भगवान महावीर भोजनालयाचे संचालक मिलापचंद पटवा यांनी केले. या सेवेत योगदान देताना त्यांचे डोळेही पाणावले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त मिलापचंद पटवा परिवाराच्या सहकार्याने आयोजित जनरल सर्जरी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रुपेश पटवा, अमित पटवा, लीलाबाई पटवा, नम्रता पटवा, निकिता पटवा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, जनरल सर्जन डॉ. प्रवीण मुनोत, डॉ. विवेक भापकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मिलापचंद पटवा पुढे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांचीही सोय व्हावी या उद्देशाने भगवान महावीर भोजनालयाच्या माध्यमातून अल्पदरात सात्विक व पोटभर जेवण दिले जाते. या भोजनालयाचा दररोज दीड ते दोन हजार नागरिक लाभ घेत आहेत. मागील १४ वर्षांपासून ही सेवा अखंडपणे सुरू असून सेवाभावाने केलेले हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. हॉस्पिटलमध्ये येणारा रुग्ण उपचार घेऊन बरा होऊन बाहेर पडतो, हीच सेवाकार्याची खरी समाधानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक करताना संतोष बोथरा यांनी सांगितले की, पटवा परिवार अत्यंत सेवाभावी असून हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांची भूक भागविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करीत आहेत.

# फिरोदिया शिवाजियन्सचा वरिष्ठ पुरुष क्लब लीग स्पर्धेत दिमाखदार प्रवेश

**राज्यातील सर्वोच्च क्लब स्पर्धेत जिल्ह्याचा पहिल्यांदा सहभाग**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्रात पहिल्यांदाच उत्कृष्ट कामगिरी करत फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लबने वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन वरिष्ठ पुरुष क्लब लीग अजिंक्यपद स्पर्धा २०२६ या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. अहिल्यानगरमधील एखाद्या क्लबला प्रथमच या राज्यस्तरीय सर्वोच्च व्यावसायिक स्पर्धेत खेळण्याची संधी मिळाली आहे.

ही तीन टप्प्यांत पार पडणारी स्पर्धा ७ मार्च २०२६ पासून लोणावळा (जि. पुणे) येथे सुरू होणार आहे. फिरोदिया शिवाजियन्सचा संघ ६ मार्च रोजी लोणावळ्याकडे रवाना होणार असून, जिल्ह्याच्या फुटबॉल इतिहासातील हा अत्यंत अभिमानास्पद क्षण ठरला आहे.

या स्पर्धेला विशेष महत्त्व आहे. कारण विजेत्या संघाला राष्ट्रीय स्तरावरील आय–लीग ३ मध्ये पदोन्नतीची संधी मिळणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्वोत्तम संघांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करण्याबरोबरच राष्ट्रीय पातळीवर झेप घेण्याची संधीही क्लबसमोर आहे. अहिल्यानगरसारख्या जिल्ह्यातून आलेल्या संघासाठी ही स्पर्धा म्हणजे केवळ सहभाग नव्हे, तर व्यावसायिक फुटबॉल क्षेत्रात मोठी झेप घेण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.

क्लबच्या या ऐतिहासिक यशामागे प्रशिक्षक मंडळाची सातत्यपूर्ण मेहनत आहे. प्रशिक्षक मंडळात जेव्हिअर स्वामी, सचिन पठारे, राजेश अँथनी, पल्लवी सैंदाणे, श्रेया सागडे आणि अभिषेक सोनवणे यांचा समावेश असून त्यांनी संघाची काटेकोर तयारी करून घेतली आहे.

संघात मयूर गोरखा, रोशन रिकामे, प्रदीप सिंह, शुभम राऊत, अभिजीत निकोल्सन, रौनक जाधव, अभय साळवे, अरमान फकीर, सार्थक भोसले, शाह नवाज, अतुल डे, हिमांशू थोरात, सलमान शेख, सुयोग महागडे, उत्कर्ष सोनवणे, ऋषभ मणी, साहिल कुसाळकर, जोएल पठारे, नील धेंडवाल, शुभम शिवानंद, ओईनाम महेश, इम्रान शेख, अनोश कामाठी, इमॅन्युएल पिल्ले आणि दर्शन पवार या खेळाडूंचा समावेश आहे.

संघाचे फिजिओथेरपिस्ट म्हणून डॉ. आश्री बगदादी कार्यरत असून खेळाडूंच्या तंदुरुस्तीवर विशेष भर दिला जात आहे. फिरोदिया शिवाजियन्सचा पहिला सामना ७ मार्च रोजी बलाढ्य मुंबई फुटबॉल क्लब विरुद्ध होणार आहे. या सामन्याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. अनुभवी आणि मजबूत संघाविरुद्ध खेळताना फिरोदिया शिवाजियन्सची खरी कसोटी लागणार आहे.

या यशात अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे क्लबने नमूद केले आहे. तसेच सराव व तयारीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल अहमदनगर महाविद्यालय या स्थळ भागीदाराचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

क्लबचे सहमालक नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वाळवेकर यांनी सांगितले की, ''फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब हा क्लबचा दर्जा उंचावण्यासाठी आणि अहिल्यानगरचे राज्य पातळीवर अभिमानाने प्रतिनिधित्व करण्यासाठी कटिबद्ध आहे.'' राज्याच्या सर्वोच्च स्तरावर सहभाग नोंदवत फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लबने अहिल्यानगरच्या क्रीडा विश्वात आपली छाप सोडली आहे.

# 'हिरवे ना भगवे, माणुसकीचे रक्त लालच असते' – प्रा. सुभाष वारे

**। लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात**

**। विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणातून भारताच्या विविध संस्कृतींचे दर्शन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय यांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. विद्यार्थ्यांनी आषाढीतील दिंडी, कोळीगीत, साउथ इंडियन व काश्मिरी गीत तसेच ठसकेदार मराठमोळी लावणी सादर करून भारतातील विविध प्रांतांच्या संस्कृतीचे रंगमय दर्शन घडवले. त्यांच्या आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले हिंदवी स्वराज्य आणि छत्रपती संभाजी महाराजांचा संघर्ष व पराक्रम विद्यार्थ्यांनी रंगमंचावर प्रभावीपणे साकारला. या प्रसंगी सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन कर्मवीर भाऊराव व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रसेवा दलाचे अध्यक्ष प्रा. सुभाष वारे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, ॲड. रवींद्र शितोळे, जनकल्याण शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. शिवाजी विधाते, अनिल साळुंखे,माजी प्राचार्य के.एच. शिंदे, अर्जुनराव पोकळे, संस्थेचे लाईफ मेंबर सदस्य शिवाजी लंके, शब्दगंधचे सचिव सुनील गोसावी, स्कूल कमिटी सदस्य श्यामराव व्यवहारे, शेखर व्यवहारे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी सांगितले की, शाळा गुणवत्तेच्या बाबतीत आघाडीवर असून अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये शालेय विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत तसेच जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत मोठ्या संख्येने चमकले आहेत. कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही विद्यार्थ्यांची उल्लेखनीय प्रगती सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. सुभाष वारे आपल्या मनोगतात म्हणाले की, ''निसर्गाने प्रत्येकाला माणूस म्हणून जन्म दिला आहे; जाती–धर्म या नंतरच्या उतरंडी आहेत. शिक्षणातून विद्यार्थी 'माणूस' म्हणून घडला पाहिजे. हीच आजच्या शिक्षणाची खरी गरज आहे.'' क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी हालअपेष्टा सहन करून शिक्षणाची दारे बहुजनांसाठी खुली केली. हा वारसा कर्मवीर अण्णा व लक्ष्मीबाई यांनी पुढे चालवला आणि शिक्षणाच्या चळवळीतून बहुजनांची मुले शिकवली, असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांकडून ''सगळ्या कळ्या उमलू द्या... सगळे फुल फुलू द्या!'' ''रक्त भगवे, हिरवे नसते... माणुसकीचे रक्त फक्त लाल असते!'' ''ना जातीचे ना धर्माचे, शिवराय सर्व जातीचे!'' या घोषणाही दिल्या

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वाचनातून साहित्याकडे वळावे. वाचनाची आवड निर्माण झाली तर जीवन समृद्ध होते. वह्या खरडणे म्हणजे शिक्षण नव्हे; ज्ञान, बुद्धी आणि माणुसकी शिक्षणातून विकसित व्हावी. वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले शिक्षणच स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना टिकवू शकते. शिक्षणात संस्कारांचा अंतर्भाव असावा. मन, मेंदू आणि मनगट सक्षम करणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असावे. मानवतावादी विचारातून राष्ट्रनिर्मिती झाली पाहिजे, तेव्हाच देश घडेल, असे त्यांनी स्पष्ट केले. शब्दगंधचे सुनील गोसावी यांनी विद्यार्थ्यांना मोठे होण्यासाठी पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला.

गणेश वंदनेने सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. मराठी तडका, बॉलीवुड गीतांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. मल्हारी रिमिक्स आणि मराठी रिमिक्सने धमाल उडवली. देशासाठी बलिदान देणाऱ्या भारतीय जवानांसाठी सादर करण्यात आलेल्या विशेष गीताने वातावरण देशभक्तीमय झाले. गोंधळ गीताद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम साकारण्यात आला. 'छावा' चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचा प्रसंग रंगमंचावर उभा राहताच उपस्थित प्रेक्षक भारावले. पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता दोमल, स्मिता पिसाळ आणि प्रदीप पालवे यांनी केले. आभार शिवाजी लंके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उर्मिला साळुंके, मिनाक्षी खोडदे, रुपाली वाबळे, अमित धामणे, मंगेश कारखिले , जयश्री खांदोडे, शितल रोहोकले, भाग्यश्री लोंढे, भारती राऊत, इंदूमती दरेकर, पुनम घाडगे सोनाली अनभुले, कांचन मदने, रूपाली गाडे, आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नाथषष्ठी सोहळ्यास प्रारंभ; नाथ वाड्यातील रांजण भरण्याची परंपरा

**गोदावरीतून कावडीने पाणी आणून रांजण पूजन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** शांतिब्रह्म संत श्री एकनाथ महाराज यांच्या पावन नगरीत नाथषष्ठी उत्सवाची सुरुवात भक्तिमय वातावरणात झाली. परंपरेनुसार नाथ वाड्यातील रांजण भरण्याचा धार्मिक विधी आज पार पडला.

भाविकांनी गोदावरी नदीतून कावडीने पाणी आणून नाथ वाड्यातील रांजणात भरले. तुकाराम बीजच्या दिवशी विविध धार्मिक विधी करून नाथषष्ठी सोहळ्यास औपचारिक प्रारंभ करण्यात आला. या वेळी भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

नाथ वाड्यातील सेवेकऱ्यांकडून ही परंपरा दरवर्षी भक्तिभावाने पाळली जाते. गोदावरीचे पाणी कावडीने आणून रांजण भरण्याची ही परंपरा संत एकनाथ महाराजांच्या काळापासून चालत आली असल्याचे सांगितले जाते. नाथ मंदिर परिसरात नाथषष्ठी उत्सवानिमित्त पुढील काही दिवस विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन व पूजा–अर्चा होणार असून भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

# कराळे क्लब हाऊसमध्ये पै. लक्ष्मण धनगर यांचा दिमाखदार सत्कार

**माणकेश्वर केसरी किताब पटकावल्याबद्दल भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ''कुस्ती हा आपल्या महाराष्ट्राच्या मातीतला खेळ आहे. पै. लक्ष्मण धनगर यांनी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर माणकेश्वर केसरी किताब जिंकत जुन्नर तालुक्याचे नाव उंचावले आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी खेळात पुढे येऊन राज्य आणि देश पातळीवर यश संपादन करावे. अशा खेळाडूंना आवश्यक ती मदत व प्रोत्साहन देण्यासाठी आपण कायम तत्पर राहू.'' असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

कराळे क्लब हाऊसमध्ये जुन्नर तालुक्यातील माणकेश्वर केसरी कुस्ती स्पर्धेत खुल्या गटातून प्रथम क्रमांक पटकावणारे पै. लक्ष्मण धनगर यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व माजी खासदार

डॉ. सुजय विखे पाटील उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पै. धनगर यांना सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास पै. शिवाजीराव कराळे, माजी महापौर व नगरसेवक बाबासाहेब वाकळे, करण कराळे, उदय कराळे, पुष्कर कुलकर्णी, राम कराळे, गजानन कराळे, महेश कराळे, श्रीनिवास कराळे, रवींद्र वाकळे, डॉ. पठारे, डॉ. कदम, डॉ. साळवी, अविनाश जाधव, संदीप आडोळे, सर्वेश देशमुख, भरत चिपाडे, प्रसाद गांगरडे, अमोल दंडवते, शुभम वाकळे, अभिषेक तांबे, रवींद्र गोरे, अभिजित म्हस्के, नयन दंडवते, जगन्नाथ भगत, अभिजीत पाटील , मुसळा धनगर, नवनाथ धनगर, दीपक धनगर, राजू धनगर, तात्या धनगर, पांडुरंग धनगर व श्रीनाथ धनगर आदी मान्यवर उपस्थित होते.

माणकेश्वर केसरी, जुन्नर (जिल्हा पुणे) येथे पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत खुल्या गटातून अव्वल येत पै. लक्ष्मण धनगर यांनी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

(पान १ वरून)

## श्रीपाद छिंदमकडून शिवजयंतीचा डामडौल

गेल्याने राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. या प्रकारानंतर श्रीपाद छिंदमला मोठे दुष्परिणाम भोगावे लागले. उपमहापौर पद तसेच नगरसेवक पदावरही संकट आले तसेच सामाजिक व राजकीय नुकसान त्याला सोसावे लागले.

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत श्रीपाद छिंदम बसपाच्या तिकिटावर निवडूण आल्यावर अवघ्या दीडच महिन्यात तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती उत्सवानिमित्त श्रीपाद छिंदमने दिल्ली गेट येथे मोठा मंडप व देखावा उभारला आहे. हा देखाव नागरिकांचे लक्ष वेधून घेत असतानाच हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी आक्षेप घेण्यास सुरुवात केली आहे. बुधवारी रात्री एका कार्यकर्त्यांने श्रीपाद छिंदम या शिवद्रोहीला शिवजयंती साजरी करण्याचा कोणताही अधिकार नसल्याबाबत आक्षेप घेतला आहे. तसेच पोलिसांकडेही काही कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी त्याबाबत छिंदमची भेट घेऊन श्रीपादऐवजी त्याचे बंधू श्रीकांत यांच्या नावाचे बोर्ड आणि स्टिकर लावण्याबाबत पर्याय सुचवला आहे. या संदर्भातील बदलाच्या हालचाली गुरुवारी दुपारी उशिरा सुरु होत्या. त्यामुळे पोलिस आणि हिंदूत्वादी संघटना काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.